# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 29 ) 15th November 2004 ( No : 08


# प्रा.बी.टी.देशमुख यांना विजयी करा

## *नुटा व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळाच्या संयुक्त बैठकीतील निर्णय*

वर्धा- दि. ११.०७.२००४ : नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाने (नुटाने) विधानपरिषदेसाठी **अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून** संघटनेचे अध्यक्ष **प्रा.बी.टी.देशमुख** यांना अधिकृत उमेदवार म्हणून उभे करण्याचे ठरविले असून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून नुटाचे अधिकृत उमेदवार **प्रा.बी.टी.देशमुख** यांना पाठींबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

२. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने **नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून श्री.व्ही.यु.डायगव्हाणे** यांना अधिकृत उमेदवार म्हणून उभे केले असून नुटाने **नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून** विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अधिकृत उमेदवार **श्री.व्ही.यु.डायगव्हाणे** यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

३. माजी आमदार व ज्येष्ठ शिक्षक नेते श्री. ना.बा.सपाटे यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही संघटनांच्या कार्यकारी मंडळाची संयुक्त बैठक होऊन त्या सभेत पुढील निर्णय जाहीर करण्यात आला. :-

(i) अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून प्रा.बी.टी.देशमुख व नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांना निवडून आणण्यासाठी उभय शिक्षक संघटनांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे निर्धारपूर्वक ठरविण्यात येत आहे. दोन्ही संघटनांच्या सर्व सभासदांनी, हितचिंतकांनी, चाहत्यांनी व मतदारांनी अमरावती विभाग पदवीधर व नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून अनुक्रमे प्रा.बी.टी.देशमुख व श्री.व्ही.यु.डायगव्हाणे यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

(ii) तसेच प्रगतिशील विचारांच्या संघटनांनी आणि सर्व राजकीय पक्षांनी उभय उमेदवारांना पाठिंबा द्यावा, अशी त्यांना विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **श्री.वसंतराव खोटरे** | **श्री.ना.बा.सपाटे** | **डॉ.एकनाथ कठाळे** |
| *अध्यक्ष, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ* | *संयुक्त सभेचे अध्यक्ष* | *सचिव, नुटा* |

**पदवीधर मतदार संघातून लागोपाठ पाचव्यावेळी विधानपरिषदेवर निवडून जाणारा आपला प्रतिनिधी हा असा पहिलाच प्रतिनिधी असेल; पण त्यासाठी आपण मतदान केंद्रावर अगत्यपूर्वक पोहचले मात्र पाहिजे.**

# प्रा.बी.टी.देशमुख यांची पदवीधर मतदारांना विनंती

अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर एक सदस्य निवडून देण्यासाठी मंगळवार, दिनांक ३० नोव्हेंबर २००४ रोजी निवडणूक होत आहे. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचा (नुटा) अधिकृत उमेदवार म्हणून मी या निवडणूकीत उभा असून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने माझ्या उमेदवारीला पाठींबा दिलेला आहे.

गेली २४ वर्षे विधानपरिषद सदस्य या नात्याने मी काम करीत आहे. विविध व्यवसायातून काम करणाऱ्या व्यावसायिकांच्या हितसंबंधांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे दमदार व जोमदार व्यासपीठ म्हणून मी माझ्या सदस्यत्वाचा उपयोग केलेला आहे. सर्व स्तरावरील शिक्षक, कर्मचारी, अधिकारी, प्राध्यापक, प्राचार्य, पदवीधर व अभियंते यांचे प्रश्न मी त्या व्यासपीठावरून प्रभावीपणे मांडले आहेत. विशेषतः जलसिंचन, नागरी पाणीपुरवठा, रस्ते, उद्योग या विकासक्षेत्रातील अनुशेष विषयक प्रश्न मी सर्व शक्तीनिशी त्या व्यासपीठावरुन मांडले आहेत. याशिवाय विदर्भातील विविध स्वरूपाचे अनेक शैक्षणिक, आर्थिक, कृषिविषयक, सामाजिक, सांस्कृतिक व अनुशेष विषयक प्रश्न सोडविण्यासाठी सुद्धा मी त्या व्यासपीठाचा वापर केलेला आहे.

आपण पसंतीच्या प्रथम क्रम अंकाचे (१) मत मला देवून उपकृत करावे ही विनंती.

आपला नम्र,
**बी.टी.देशमुख**

***मतदानाची तारीख : मंगळवार, दिनांक ३० नोव्हेंबर २००४***
***वेळ : सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत***

# आतापर्यंत अशा प्रकारची शिफारस करण्याचा अधिकार विधानपरिषदेला आहे हेच अनेकांना माहित नव्हते. - मा. सभापती

राष्ट्रकुल संसदीय मंडळ : महाराष्ट्र शाखा, राज्यातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत आयोजित करण्यात आलेला ३४ वा, संसदीय अभ्यासवर्ग, सन २००३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय : विधान भवन, मुंबई ४०० ०३२, "विधानपरिषदेचे महत्व व दोन्ही सभागृहातील समन्वय" या विषयावर मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर २००३ रोजी मा. सभापती श्री. ना.स.फरांदे यांचे झालेले व्याख्यान.

**मा. सभापती श्री.ना.स.फरांदे :-** "......गेल्याच अधिवेशनामध्ये मुंबईमध्ये विनियोजन विधेयक विधानसभेकडून विधानपरिषदेकडे शेवटच्या दिवशी आले, शेवटच्या दिवशी सुद्धा शेवटच्या तास दोन तासात आले. त्याला एक महत्त्वाची शिफारस, म्हणजे राज्यातील मागास भागांच्या किंवा अनुशेषग्रस्त भागांच्या दृष्टीने एक शिफारस एकमताने विधानपरिषदेने मंजूर केली त्याला कोणीही विरोध केला नाही. **आतापर्यंत अशा प्रकारची शिफारस करण्याचा अधिकार विधानपरिषदेला आहे हेच अनेकांना माहित नव्हते.** अर्थविषयक विधेयकाच्या बाबतीतच नव्हे पण इतर जी विधेयके आहेत त्यालाही दुरुस्ती करता येते. त्या ठिकाणी केवळ शिफारस नाही तर दुरुस्ती करता येते. पण हे अर्थविषयक विधेयक असल्यामुळे याला शिफारस करण्याचा अधिकार परिषदेला आहे. एक शिफारस केली आणि पाठविली. परंतु तोपर्यंत विधानसभेचे अधिवेशन संपलेले होते. आता काय करायचे? डेडलॉक म्हणतात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली. ते बुद्धिपुरस्पर झाले, मुद्दाम केले, अडवणूक, वगैरे, वगैरे अशा प्रकारचे बोलले गेले. शेवटच्या दिवशी आले, आल्यानंतर समोर पाहिलं, सदस्यांना वाटलं आणि त्यातही मतभेद नव्हते. सभागृहामध्ये शासनाचे प्रतिनिधी, मंत्रीमहोदय उपस्थित होते, त्यांनीही या शिफारसीला विरोध केला नाही किंवा "असे करायला नको" असेही म्हटले नाही. पण विधानसभेचे अधिवेशन तर समाप्त झालेले होते. त्यामुळे विधानसभेचे एका दिवसाचे विशेष अधिवेशन हे या शिफारशीचा विचार करण्यासाठी पुन्हा बोलवावे लागले.......

.......महाराष्ट्राच्या काही **सुप्रसिद्ध वर्तमानपत्रांनी अग्रलेख लिहून आणि काहींची पत्रके प्रसिद्धी करुन हा अधिकारच विधानपरिषदेला नाही, असे सांगितले आणि टीकासुद्धा झाली. पण प्रत्यक्ष जेंव्हा सर्व पाहिले तेव्हा समजले की, हा अधिकार विधानपरिषदेला आहे. एक दिवसाचे अधिवेशन बोलवावे लागले. त्या अधिवेशनामध्ये विधानपरिषदेने केलेली शिफारस विधानसभेने जशीच्या तशी, एकाही शब्दाचा फरक न करता, कोणताही विरोध न करता मान्य केली.** राज्यातील अनुशेषग्रस्त जो भाग आहे, त्यातील विकासाचा अनुशेष दूर व्हावा, कालबद्ध कार्यक्रमानुसार व्हावा, यासाठी जो काही निधी आहे, त्याचा कशा रीतीने विनियोग करावा हे सूचविणारी, अशा प्रकारची ती शिफारस होती. माननीय राज्यपालांनी काढलेल्या अध्यादेशाची अंमलबजावणी व्हावी एवढाच त्यामध्ये उद्देश होता."

*( - राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन, मुंबई ४०० ०३२ यांच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या "राज्यातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत आयोजित करण्यात आलेला ३४ वा संसदीय अभ्यासवर्ग, सन २००३" या पुस्तकाचे पृष्ठ २४ व २५ पहा )*

# भारतीय संविधानाच्या इतिहासात ही गोष्ट प्रथमच घडलेली होती व या घटनाक्रमाचे नेतृत्त्व आमचा प्रतिनिधी करीत होता.

"आतापर्यंत अशा प्रकारची शिफारस करण्याचा अधिकार विधानपरिषदेला आहे हेच अनेकांना माहित नव्हते........ सुप्रसिद्ध वर्तमानपत्रांनी अग्रलेख लिहून आणि काहींची पत्रके प्रसिद्धी करुन हा अधिकारच विधानपरिषदेला नाही, असे सांगितले आणि टीकासुद्धा झाली. पण प्रत्यक्ष जेंव्हा सर्व पाहिले तेव्हा समजले की, हा अधिकार विधानपरिषदेला आहे. एक दिवसाचे अधिवेशन बोलवावे लागले. त्या अधिवेशनामध्ये विधानपरिषदेने केलेली शिफारस विधानसभेने जशीच्या तशी, एकही शब्दाचा फरक न करता कोणताही विरोध न करता मान्य केली." असे उद्‌गार खुद्द मा. सभापतींनी आपल्या भाषणात काढले.

गुरुवार, दिनांक १० एप्रिल २००३ रोजी विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी आपली शिफारस सभागृहात मांडण्यात यश मिळविले. भारतीय संविधानाच्या कलम २०४ अन्वये "विनियोजन विधेयकाला सुधारणा सुचविण्याचा अधिकार आमच्या सभागृहाला नाही पण कलम १९८ अन्वये अशा विधेयकाबाबत शिफारस करण्याचा अधिकार आमच्या सभागृहाला निश्चितच आहे". **असा आग्रह धरणारा व सभागृहासमोर त्या शिफारसीबाबतचा ठराव मांडणारा, सांवैधानिक इतिहास घडविणारा प्रतिनिधी हा अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाचा प्रतिनिधी होता ही खचितच अभिमानास्पद बाब आहे.** विधानपरिषदेत अशा शिफारसीचा मसुदा मांडल्या गेला, तो सभागृहात एकमताने स्वीकारला गेला, त्यासाठी विधानसभेचे एक दिवसाचे खास अधिवेशन बोलवावे लागले, विधानसभेने ती शिफारस एकमताने मान्य केली, भारतीय संविधानाच्या इतिहासात ही गोष्ट प्रथम घडलेली होती व या घटनाक्रमाचे नेतृत्त्व आमचा प्रतिनिधी करीत होता. हे सारे कशासाठी होते? मा. सभापतींच्या शब्दातच सांगायचे तर "राज्यातील अनुशेषग्रस्त जो भाग आहे, त्यातील विकासाचा अनुशेष दूर व्हावा, कालबद्ध कार्यक्रमानुसार व्हावा, यासाठी जो काही निधी आहे, त्याचा कशा रीतीने विनियोग करावा हे सूचविणारी, अशा प्रकारची ती शिफारस होती. माननीय राज्यपालांनी काढलेल्या अध्यादेशाची अंमलबजावणी व्हावी एवढाच त्यामध्ये उद्देश होता."

## सतत लागोपाठ पाचव्या वेळी अपक्ष सदस्य म्हणून पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर निवडून जाणारा भारतातील पहिला प्रतिनिधी हा आमचा प्रतिनिधी असेल. हा इतिहास घडविण्यात आपण सर्वचजण सहभागीदार व समभागीदार होऊ या!

***प्रा.बी.टी.देशमुखांसारखे जागृत सदस्य असतील तर प्रश्नाला न्याय मिळाल्याखेरीज त्याचा पाठपुरावा करण्याचे थांबत नाहीत. अमरावतीसारख्या महानगरपालिकेला १० टक्के लोकवर्गणी सरकारकडून कशी माफ करून घेतली हे आम्हाला माहित आहे. त्यावेळी त्या खात्याचे श्री. सुब्रम्हण्यम् हे मंत्री होते. त्यावेळी प्रा.बी.टी.देशमुख यांनी त्यांना बरोबर शब्दात पकडले आणि त्यामुळे श्री. शंकरराव चव्हाण यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांनासुद्धा त्यांची मागणी मान्य करावी लागली. तेव्हा या सभागृहाचे महत्त्व आम्ही जाणून आहोत.-श्री.विलासराव देशमुख***

## "मुख्यमंत्री विलासराव देशमुख : यांची निवडक भाषणं : १९९९-२०००" - संपादक : कपील पाटील

*महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त 'वरिष्ठ सभागृहाची महत्ता' सांगणारे जे भाषण महाराष्ट्राचे तत्कालीन व विद्यमान मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी दिनांक २० जुलै २००० रोजी केले, ते त्यांच्या निवडक भाषणांचा संग्रह असलेल्या कपील पाटील यांनी संपादित केलेल्या व लोकमुद्रा प्रकाशनने प्रकाशित केलेल्या पुस्तकात समाविष्ट आहे. त्यांच्या त्या भाषणातील एक उतारा पुढील प्रमाणे :-*

**"एक गोष्ट मात्र खरी की, वरच्या सभागृहामध्ये मंत्री म्हणून काम करणे अधिक अवघड जाते, हे मी अनुभवावरून सांगतो. मंत्री म्हणून काम करण्याचा मला अनेक वर्षांचा अनुभव आहे. वरच्या सभागृहामध्ये अधिक तयारी करून यावे लागते. शिक्षण खात्याचा मंत्री असेल तर त्याला अधिक तयारी करून यावे लागते.** प्रा. रामकृष्ण मोरे हे माझ्या मताशी सहमत असतील. एखाद्या प्रश्नाच्या संदर्भातील निघालेले जी. आर., त्यांच्या तारखा या सर्वांचा अभ्यास करून यावे लागते. कारण अगदी बारीकसारीक गोष्टी वरच्या सभागृहामध्ये विचारल्या जातात. या सभागृहाच्या संदर्भात आणखी एक गोष्ट अशी की, या सभागृहामध्ये आल्यानंतर एक जवळीक निर्माण होते. सभागृह लहान असल्यामुळे प्रश्नांची उत्तरे देत असतांना इन्टरॅक्शन्स होत असतात, वेळही भरपूर मिळतो. **खालच्या सभागृहामध्ये तेवढी संधी मिळत नाही. खालच्या सभागृहामध्ये एखाद्या वेळेस तयारी नसेल तर वेळ कशी मारून न्यायची, हे बऱ्याचदा मंत्र्यांना अवगत असल्यामुळे फारशी अडचण होत नाही. परंतु वरच्या सभागृहामध्ये मात्र तयारी करूनच यावे लागते. कित्येक वेळा मागच्या प्रश्नाचा संदर्भ विचारला जातो.** नागपूर अधिवेशनामध्ये अमुक तारखेला अमुक एका प्रश्नाला अमुक अमुक उत्तर दिलेले आहे त्याबाबतीत पुढे काय झाले, असेही विचारले जाते.

नागपूरचे अधिवेशन आणि त्यानंतरचे मुंबईतील अधिवेशन या दरम्यान मंत्री बदललेले असतात, त्यांची खाती बदललेली असतात. या सगळ्या घडामोडी फार झटपट होतात. तसेच स्थिरता अस्थिरता या आणखी वेगळ्या समस्या खालच्या सभागृहामध्ये असतात. त्यामुळे मागच्या वेळी नेमका कोणता प्रश्न विचारला होता, हे काही मंत्री कधी कधी वाचत नाही आणि मग त्या मंत्र्यांची जितकी पंचाईत करता येईल, तितकी केली जाते. ..... ..... विधानपरिषदेमध्ये काम करणे ही एक प्रकारे मंत्र्यांची परीक्षाच असते. विधानपरिषदेमध्ये जो मंत्री परीक्षेला उतरतो, तो मंत्री म्हणून बरीच वर्षे टिकतो, असा माझा अनुभव आहे. कारण मी जेंव्हा पहिल्यांदा राज्यमंत्री झालो त्यावेळी माझ्याकडे शिक्षण खाते होते. शिक्षण खात्यामध्ये एकदा माणूस उत्तीर्ण झाला की मग तो कुठल्याही खात्यामध्ये फारसा अडकत नाही. श्री. अनिल देशमुख यांनाही तोच अनुभव आहे. शिक्षण खात्याचा मंत्री झाल्यानंतर प्राथमिक शिक्षणासंबंधी, माध्यमिक शिक्षणासंबंधीचे काढलेले जी. आर., त्यांच्या तारखा, पाचवा वेतन आयोग कधी मिळाला, त्याच्या फरकाची रक्कम कधी मिळाली, पेन्शन इत्यादी सर्व गोष्टींचा अभ्यास करूनच वरच्या सभागृहामध्ये यावे लागते. **प्रा.बी.टी.देशमुखांसारखे जागृत सदस्य असतील तर प्रश्नाला न्याय मिळाल्याखेरीज त्याचा पाठपुरावा करण्याचे थांबत नाहीत. अमरावतीसारख्या महानगरपालिकेला १० टक्के लोकवर्गणी सरकारकडून कशी माफ करून घेतली हे आम्हाला माहित आहे. त्यावेळी त्या खात्याचे श्री. सुब्रम्हण्यम् हे मंत्री होते. त्यावेळी प्रा.बी.टी.देशमुख यांनी त्यांना बरोबर शब्दात पकडले आणि त्यामुळे श्री. शंकरराव चव्हाण यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांनासुद्धा त्यांची मागणी मान्य करावी लागली. तेव्हा या सभागृहाचे महत्त्व आम्ही जाणून आहोत.**

कशा पद्धतीने मंत्र्यांना शब्दांत पकडायचे, प्रश्न लावून धरायचा, जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी त्या प्रश्नाचा सतत पाठपुरावा कसा करायचा आणि शेवटी न्याय मिळवायचा, ही काम विधानपरिषदेच्या माध्यमातून प्रभावीपणे घडलेली आहेत. हे मी माझ्या अनुभवांवरून आपणास सांगत आहे. या सभागृहाचे एक वेगळे महत्त्व आहे. या सभागृहातील चर्चेचा स्तर आणि मार्गदर्शन हा एक वेगळा भाग झाला. परंतु प्रश्नाला न्याय मिळवून देणे आणि अतिशय महत्त्वाच्या प्रश्नांचा सतत पाठपुरावा करणे, ही काम या सभागृहामध्ये प्रभावीपणे होतात. **विधानसभेच्या एका सत्रामध्ये विचारलेला प्रश्न बहुतांशी पुढच्या विधानसभेच्या सत्रामध्ये आपण विसरून जातो किंवा नवीन प्रश्न आपण विचारतो. पण विधानपरिषदेमध्ये हे घडत नाही. या सत्रातून पुढच्या सत्रात, पुढच्या सत्रातून त्यापुढच्या सत्रात अशा पद्धतीने त्या प्रश्नाचा निकाल लागेपर्यंत त्या प्रश्नाचा पाठपुरावा करण्याचे काम विधानपरिषदेमध्ये अधिक परिणामकारकरित्या होते,** हे मुद्दाम सांगू इच्छितो. म्हणून अशा पद्धतीच्या सभागृहाची आवश्यकता आहे."

## मतदान कसे करावे ?

१. निवडणूक अधिकाऱ्याने पुरविलेल्या जांभळ्या रंगाचे स्केच पेनच वापरा. मतपत्रिकेसोबत हे स्केच पेन तुम्हाला देण्यात येईल.

२. मतदान करतांना उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर "पसंतीक्रम" म्हणून असलेल्या स्तंभामध्ये १ असा अंक लिहून मतदान करावयाचे असते. उदा. प्रा.बी.टी.देशमुख यांच्या नावापुढे पसंतीचा १ हा अंक लिहावा.

३. अन्य पद्धतीने मतदान केल्यास उदा. खुण करून किंवा अक्षरात एक, प्रथम, फर्स्ट अशी अक्षरे लिहिल्यास मतपत्रिका रद्द होते.

४. पसंतीचा १ हा क्रमांक एकाच उमेदवाराच्या नावापुढे लिहावा. दोघांच्या नावापुढे लिहील्यास मतपत्रिका रद्द होते.

५. प्रा.बी.टी.देशमुख यांच्या नावासमोर पुढील प्रमाणे पसंतीचा १ हा क्रमांक लिहावा. तो इंग्रजी किंवा मराठी अंकात टाकलेला चालतो. अक्षरात मात्र टाकू नये.

| | |
|---|---|
| प्रा.बी.टी.देशमुख | १ |

***''विधानपरिषदेतील उदाहरण मी या प्रसंगी देऊ इच्छितो. मा. प्रा.बी.टी.देशमुखांसारखा आदर्श लोकप्रतिनिधी केवळ शैक्षणिक प्रश्नच मांडत नाहीत तर हाडाचे ते शेतकरी, काळ्या आईशी इमान राखणारे म्हणून शेतीचा प्रश्न, कापसाचा प्रश्न, संत्र्याचा प्रश्न त्याचबरोबर शिक्षणाचे प्रश्नही तितक्याच पोटतिडीकीने मांडतात. सांस्कृतिक आक्रमणाबद्दल, समाजातील अनिष्ट व वाईट प्रथांबद्दल तितकेच पोटतिडीकीने ते बोलतात. त्यांचा त्वेष सभागृहात मी पाहिलेला आहे'' -*** **मा.श्री. उल्हास पवार, ज्येष्ठ काँग्रेस नेते**

*(राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन, मुंबई ४०० ०३२ यांच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या "राज्यातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत आयोजित करण्यात आलेला ३४ वा संसदीय अभ्यासवर्ग, सन २००३" या पुस्तकाचे पृष्ठ ५२ पहा)*

# *हे विचारा त्यांना; आणि त्यांना हेही विचारा*

निवडणूक ही दोन व्यक्तींमधील निवड अशा स्वरुपाची कधीच नसते. ज्या व्यक्तींची आपण निवड करीत असतो त्या व्यक्ती सार्वजनिक प्रश्नावरील काही भूमिकांचे प्रतिनिधित्व करित असतात. "शिक्षक कर्मचारी - पदवीधर यांचे प्रश्न मांडण्यासाठीचे व सर्वांत जास्त अनुशेषात असलेल्या विभागातील अनुशेषाचे प्रश्न मांडण्याचे जोरदार व्यासपीठ" ही या सदस्यत्वाकडे पहाण्याची प्रा.बी.टी.देशमुख यांची व त्यांच्या पाठीराख्या संघटनांची भूमिका आहे. जलसिंचन व उद्योगाचा अनुशेष हटल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. या बाबीचा त्यांच्या ठाम भूमिकेमध्ये समावेश आहे. त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांची व त्यांच्या पक्षाची ३७१ (२) या कलमाच्या अंमलबजावणीबाबत काय भूमिका आहे हे विचारले त्यांना व या संदर्भात इतिहास काय आहे त्यांचा? याबाबत त्यांना काही माहितीपूर्ण प्रश्न विचारल्यास आपणास बरेच काही समजून येईल.

## (१)

त्यावेळच्या शासनाने "१९९६-९७ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र" दिनांक ३० जुलै १९९६ रोजी सभागृहाला सादर केले. त्या विवरणपत्राच्या पृष्ठ ६३ वर पाटबंधारे विभागाची एक "लहानशी" मागणी (बाब क्रमांक ८४) सादर करण्यात आली होती. ७१०० कोटी रुपये एकट्या कृष्णा खोऱ्यासाठी द्यावे अशी ती मागणी होती. विदर्भाला किंवा मराठवाड्याला एक छदामसुद्धा त्यातून मिळणार नव्हता. प्रा.बी.टी.देशमुख यांनी सभागृहात आणि सभागृहाबाहेर या बाबीवर जोरदार टिका केली. १९९६ मध्ये यावर जबरदस्त टिका करणारा 'नुटा बुलेटीन'चा 'अनुशेष विशेषांक' काढला. त्या बुलेटीन मधील पृष्ठ ६६ वरील परिच्छेद १०१ व १०२ पुढील प्रमाणे :-

"**१०१.** पुरवणी मागणीचे शासनाने नमूद केलेले उपरोक्त स्पष्टीकरणात्मक निवेदन ज्यावेळी मी वाचले त्यावेळी दादाभाई नौरोजी यांनी विलायतेत केलेल्या एका अविस्मरणीय भाषणामधील ते प्रसिद्ध वाक्य मला आठवले. इंग्रज राज्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणतात "**महम्मद गझनीने १८ स्वाऱ्या करून हिंदुस्थान लुटला असे इतिहासकार सांगतात, पण त्याने या सर्व स्वाऱ्यात लुटून नेलेली संपत्ती ही तुम्ही एका वर्षात लुटून नेता तितकी होवू शकली नाही**"

यापूर्वीच्या महाराष्ट्राच्या सत्ताधाऱ्यांनी गेल्या ३० वर्षात निर्माण केलेल्या अनुशेषाएवढा (जलसिंचन या विकासक्षेत्रात) अनुशेष निर्माण करण्याचे सामर्थ्य या एका पुरवणी मागणीमध्ये आहे. **यापूर्वीच्या ३० वर्षातील ४२४२ कोटी रुपयांपैकी निदान ९२९ कोटी रुपये विदर्भाला व ११६८ कोटी रुपये मराठवाड्याला मिळाले तरी होते; यापुढे आम्ही मेलो काय किंवा जगलो काय? या ७१०० कोटी रुपयांपैकी एक छदामसुद्धा विदर्भाला किंवा मराठवाड्याला मिळणार नाही.** मात्र ३६०० कोटी रुपयांच्या कर्ज फेडीचे जे उत्तरदायीत्व महाराष्ट्र शासनाने स्वीकारले आहे, त्यात आमचा सहभाग सक्तीचा असेल. आमच्या या पिढीची शक्ती कृष्णा खोऱ्यासाठी ३५०० कोटीचे भागभांडवल उभारून देण्यामध्ये व ३६०० कोटी रुपयांच्या कर्जाच्या उभारणीसाठी सहभागी होण्यात खर्ची पडेल. उभारलेल्या या द्रव्यबळातून बिगर अनुशेष जिल्ह्यांमध्ये निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सिंचनक्षमतेचा थंडगार वारा त्या जिल्ह्यात सुटत असतांना मागास जिल्ह्यामध्ये वाढलेल्या अनुशेषाचा रखरखीत व दाहक असा प्रचंड डोंगर शिरावर घेवून आमच्या पुढच्या पिढ्या व्याज व मुद्दलाचे हप्ते फेडण्यात सहभागी व समभागी झालेल्या असतील.

**१०२.** अनुशेषाचा डोंगर वाढविण्याचा हा सारा प्रकार ज्या पाटबंधारे खात्याच्या मंत्र्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून सुरू आहे ते विदर्भातीलच आहेत हे विशेष. "तुमच्या भागातील मंत्री काय करीत होते?" अशी बोलणी खात या भागातील लोक व्याजाचे हप्ते फेडत असतांना सत्तेतुन बाहेर पडल्यानंतर मंत्र्यांना मात्र अनुशेष वाढल्यामुळे वेगळ्या विदर्भाची मागणी करण्याचा मार्ग मोकळा असेल. **सत्ताधारक राजकीय पक्षाने सत्ताधारी असतांना भरभरून अनुशेष वाढविण्याचे काम करावयाचे व त्याच पक्षाने नंतर विरोधी पक्ष या नात्याने विदर्भावर सतत अन्याय होतो म्हणून वेगळ्या विदर्भाची मागणी करावयाची; दुसऱ्या बाजूला कालपर्यंत विदर्भाच्या अनुशेषामुळे संतप्त होत असलेल्या विरोधी पक्षाने सत्ताधारक होताच तो अनुशेष वाढविण्याचे काम दुप्पट जोमाने सुरू करावयाचे हा "विदर्भ विकासाचा सर्वपक्षीय कार्यक्रम" आणखी ५-१० वर्षे असाच सुरू राहिला तर निर्माण झालेल्या अनुशेषाचा प्रचंड डोंगर पाहून "विदर्भ वेगळा काढून द्या" म्हणणारी चळवळ उद्या पश्चिम महाराष्ट्रातुन सुरू झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही."**

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणात वाढविणारे व कृष्णा खोऱ्याचे हे अनाठायी ओझे शिरावर घेणारे ....

***.... विदर्भातले हे पाटबंधारे मंत्री कोण होते? हे विचारा त्यांना आणि ते कोणत्या पक्षाचे होते? हेही विचारा त्यांना.***

## (२)

अनुशेष व निर्देशांक समिती ही त्यावेळच्या शासनाने नेमली नव्हती, तर ती मा. राज्यपालांनी नेमली होती. या समितीच्या अहवालाप्रमाणे अमरावती, अकोला (वाशिमसह) व यवतमाळ हे तीन जिल्हे ९ पैकी ९ क्षेत्रात मागास जिल्हे म्हणून निश्चित झाले होते. बुलढाणा जिल्हा हा ९ पैकी ८ क्षेत्रात अनुशेषात असल्याचे त्या अहवालात नमुद होते. या समितीने राज्याच्या सर्व जिल्ह्यांचा एकूण अनुशेष १५३५६ कोटी रुपयांचा दाखविला होता. त्यात अमरावती जिल्ह्याचा अनुशेष १३६१ कोटी रुपये, अकोला १२७२, यवतमाळ १२१० व बुलढाणा जिल्ह्याचा १०८१ कोटी रुपयांचा होता. महत्तम अनुशेष असलेले हे चार जिल्हे होते. प्रत्येकी १ हजार कोटी रुपयांच्या वर या चार जिल्ह्यांचा अनुशेष होता व असे महाराष्ट्रात फक्त हे चारच जिल्हे होते. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही जिल्ह्याचा अनुशेष १ हजार कोटी रुपयांच्या वर नाही. या समितीच्या अहवालावर शासनाने लवकर कार्यवाही केली तर विदर्भातील या अनुशेषग्रस्त जिल्ह्यांचा अनुशेष मोठ्या प्रमाणात दूर होऊ शकला असता. ११ जुलै १९९७ ला या समितीने मा. राज्यपालांना आपला अहवाल सादर केला. जुलै १९९७ मध्येच राज्यपालांनी हा अहवाल "**सदर अहवालाचा अभ्यास करून त्यावरील शासनाचे अभिप्राय मा. राज्यपालांना सादर करावे.**" म्हणून शासनाकडे पाठविला. "**निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल व त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या महत्वाच्या मुद्याबाबत विचार होणे आवश्यक असल्यामुळे मा.मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधितांची एक बैठक घ्यावी.**" असे सुरुवातीला ठरले होते. मात्र विदर्भाचा मोठा अनुशेष आहे, वित्त व नियोजनमंत्री विदर्भातील आहेत, तेव्हा याबाबत त्यांनाच अधिकार दिले तर ते लक्ष घालतील व विदर्भाला मोठा न्याय मिळेल असे वाटल्याने मा.मुख्यमंत्र्यांनी असे आदेश दिले की, "**ही बैठक मा.वित्त व नियोजन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी.**"

दुर्दैवाने विदर्भातील या वित्तमंत्र्यांनी या अहवालावर काहीच कार्यवाही न करण्याचा व निवडणूका होईपर्यंत हा अहवाल उघडसुद्धा होऊ न देण्याचा निर्णय घेतला व तो अमलात आणला. याचा मला सुगावा लागला होता. सर्व सदस्यांनी स्वाक्षरीत केलेली अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाची अधिकृत प्रत व्यक्तिशः मला १९९७ मध्येच अनौपचारिकरित्या प्राप्त झालेली होती. या अहवालाने विदर्भाचा अनुशेष ठसठशीतपणे पुढे आणलेला होता हे लक्षात घेऊन त्या अहवालातील जलसिंचन या विकासक्षेत्राशी संबंधित अधिकृत आकडेवारीचा आधार देवून "**महाराष्ट्रातील जलसिंचन**

**अनुशेष : क्ष किरण परीक्षा**" या नावाचे एक पुस्तक मे १९९८ मध्ये मी समारंभपूर्वक अमरावती येथे प्रसिद्ध केले होते. पण तो अहवाल सभागृहासमोर ठेवायला २१ डिसेंबर १९९८ रोजीसुद्धा मंत्री सभागृहात नकार देत होते.

अनुशेषग्रस्त भागाला न्याय देणारी कार्यवाही करण्याची गोष्ट तर दूरच राहिली पण अहवालसुद्धा प्रकाशात येवू देणार नाही हा त्यांनी घेतलेला कटू निर्णय विदर्भातील हे वित्तमंत्री गोड भाषेत आम्हाला २१ डिसेंबर १९९८ रोजी सभागृहात सांगत होते. जिव्हाळा आणि ओलाव्याच्या अभावी त्यांच्या गोडव्याला भंपकपणाचा दर्प येत होता. कोरडेपणा व शुष्कपणा त्यांच्या प्रत्येक वाक्यातून ओसंडून वहात होता. त्यादिवशी तारांकित प्रश्न क्रमांक ३१३२६ वर झालेल्या अनुपूरक चर्चेतील त्यांच्या उत्तरातील काही अवतरणे पुढील प्रमाणे :-

**"सभापती महोदय, त्या अहवालासंबंधी पूर्ण अभ्यास झाल्यानंतर मग सदनापुढे ठेवण्यात येईल." "ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल."** "याची मला माहिती नाही. हा जो इंडिकेटर समितीने अनुशेषाचा आकडा काढलेला आहे त्याची माहिती मी पटलावर ठेवतो...." **"या समितीने अभ्यास केल्यानंतर त्या समितीचा अहवाल मंत्रिमंडळाच्या समितीकडे येईल आणि त्यानंतर तो अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल."** "हा अहवाल सभागृहापासून लपवून ठेवण्याची या शासनाची कोणतीही इच्छा नाही .. **हा विचार पूर्ण झाल्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर ठेवल्यानंतर तो सभागृहात येईल."**

अहवाल ठेवायला सुद्धा ते तयार नव्हते तेंव्हा त्यांचा निषेध करुन आम्ही सभात्याग केल्याचे अधिकृत प्रतिवेदनात नमुद आहे.

तर आमच्या या विदर्भातील अर्थमंत्र्यांने सत्ता हातून जाईपर्यंत अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल प्रकाशात येवू न देण्याची ऐतिहासिक कामगिरी पार पाडली. पुढे सरकार बदलले. आमचा संघर्ष चालूच होता. मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळाने हा अहवाल सभागृहासमोर ठेवला. मंत्रिमंडळाने त्या अहवालाला मान्यता सुद्धा दिली व याबाबतचा शासननिर्णयही निर्गमित केला. विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते मा.श्री.नितिन गडकरी यांनी प्रकाशित केलेल्या "सिंचन अनुशेषाचा संघर्ष" या पुस्तकाच्या पृष्ठ २४१ वर हा शासननिर्णय प्रकाशित झालेला आहे. आपल्या भागातील मंत्र्यांने काढलेला शासन निर्णय प्रकाशित करण्याचे भाग्य मात्र मा.श्री. नितिन गडकरी यांना मिळू शकले नाही कारण हा अहवाल दडपून ठेवण्याची कामगिरी आमच्या विदर्भातील या मंत्र्यांने मंत्रीपद जाईपर्यंत यशस्वी रितीने पार पाडलेली होती.....

***.... काय नाव होते हो! विदर्भातील त्या मंत्र्यांचे? हे विचारा त्यांना आणि हेही विचारा त्यांना की, ते तुमच्याच पक्षाचे तर नव्हते ना?***

## (३)

राज्याच्या राज्यपालाने राज्यपाल या नात्याने केलेल्या वर्तनावर राज्याच्या विधानमंडळात घटनेप्रमाणे, कायद्याप्रमाणे, नियमाप्रमाणे चर्चा होवू शकत नाही, ही गोष्ट खरी आहे. पण याचा अर्थ राज्यपाल हा कोणी हुकूमशहा, बादशहा किंवा कुणालाच जबाबदार नसलेला पदाधिकारी असे त्याचे स्वरूप नाही. तो सरळ सरळ केंद्र शासनाला जबाबदार असतो. भारतीय संविधानाच्या कलम १५६ मध्ये स्पष्टपणे "राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत राज्यपाल त्याच्या पदावर कार्यरत असेल" अशी तरतुद आहे. "राष्ट्रपतीची मर्जी" या घटनेतील शब्दांचा व्यावहारिक अर्थ "केंद्रशासनाची मर्जी" असाच आहे. भारताच्या घटनेने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. नाममात्र राज्यप्रमुख हे या पद्धतीचे एक वैशिष्ट्य आहे. केन्द्रीय कार्यकारी विभागाचा राष्ट्रपती हा प्रमुख राहील. राष्ट्रपतीपद हे अत्यंत मानाचे व सर्वश्रेष्ठ पद समजले जाते, मात्र खरीखुरी सत्ता ही राष्ट्रपतीने वापरावयाची नसून मंत्रिमंडळाने वापरावयाची आहे. घटनासमितीमध्ये मसुदा सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले :

".... The President occupies the same position as the king under the British Constitution. He is the head of the State, but not of the Executive. He represents the nation, but does not rule the nation. He is the symbol of the nation. His place in the administration is that of a ceremonial device or the seal by which the nation's decisions are made known."

राष्ट्रपतीचे स्थान हे घटनात्मक राज्यप्रमुखाचे आहे, हे मत सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा मान्य केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास "The President has thus been made a formal or constitutional head of the executive and powers are vested in the Ministers of the Cabinet." घटनेतील कलम ७४(१) पुढीलप्रमाणे आहे. "There shall be a Council o f Ministers with the Prime Minister at the head to aid and advise the President who shall, in the exercise of his functions, act in accordance with such advice." मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच त्याने काम केले पाहिजे असे राष्ट्रपतीवर बंधन आहे.

२. गेले ३०-४० वर्षे लोकनियुक्त मंत्रिमंडळांना प्रादेशिक असमतोल दूर करण्यात अपयश आल्यामुळे कलम ३७१(२) ची उपाययोजना करण्यात आली हे अधिकार राज्यपालांनी स्वतः वापरावयाचे आहेत. महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरलनी याबाबत १७.१२.२००३ रोजी "Directives issued

***माननीय श्री.बी.टी. देशमुखसाहेब, आमच्यातील ज्येष्ठ, अभ्यासू, सिनिअर अपक्ष सदस्य आहेत. ते कोणत्याही पक्षाचे नाहीत, निस्पृह आहेत, त्यांची इन्टेग्रिटी कोणी चॅलेंज करु शकत नाही.***

**– श्री.नितीन गडकरी, मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद**

"...... राज्यपालांनी दिलेल्या ज्या डायरेक्शन्स आहेत त्या तुम्ही बाजूला ठेवणार आहात. ही गंभीर परिस्थिती आहे. या अनुशेष निर्मूलन समितीमध्ये विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील सर्व सन्माननीय सदस्य आहेत. आम्ही याठिकाणी कुठेही विदर्भाचा विषय मांडू इच्छित नाही. अनुशेष निर्मूलन समितीच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री बी.टी.देशमुखसाहेबांनी पुढाकार घेतला, ते अपक्ष सदस्य आहेत. मी प्रमुख झालो तर भाजपवाल्यांचे नाटक आहे, सन्माननीय सदस्य श्री. रणजीत देशमुख प्रमुख झाले तर ते काँग्रेसवाल्यांचे नाटक आहे आणि श्री. दत्ता मेघे प्रमुख झाले तर तर ते राष्ट्रवादीचे नाटक आहे असे होईल. **मग आम्ही निर्णय घेतला की, आमच्यातील ज्येष्ठ, अभ्यासू, सिनिअर, माननीय श्री.बी.टी.देशमुखसाहेब अपक्ष सदस्य आहेत. कमीतकमी ते कोणत्याही पक्षाचे नाहीत, निस्पृह आहेत, त्यांची इन्टेग्रिटी कोणी चॅलेंज करु शकत नाही.** मग आम्ही त्यांना विनंती केली की, बी.टी.साहेब तुम्ही आमचे प्रमुख व्हा. आम्हाला प्रोटोकॉलशी काही देणे-घेणे नाही. आम्ही तुमच्याबरोबर काम करु. आम्हाला क्रेडीट मिळाले नाही तरी चालेल. तुम्ही पुढे व्हा, **पण आमच्या या मागासलेल्या भागाला न्याय मिळाला पाहिजे. हा खरा प्रश्न आहे. तसेच या विषयावर सर्वपक्षीय आमदारांची एकजूट झाली पाहीजे याकरता आम्ही सर्वजण मागे व्हावयास तयार आहोत पण तुम्ही पुढे व्हा. अशा प्रकारची विनंती सर्वश्री. रणजित देशमुख, मी स्वतः, दत्ता मेघे इ. जणांनी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना केली आणि या फोरमतर्फे आम्ही सर्वांनी महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांना निवेदन दिले.** त्याच्या आधारावर महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांनी डायरेक्शन्स दिल्या. त्या कोणत्या दिल्या तर ' निधीचे समन्यायी वाटप. 'Equal distribution of funds for irrigation' हे याचे हेडींग आहे." **– श्री.नितीन गडकरी, मा. विरोधी पक्षनेते,**

*(तिसरे अधिवेशन २००२ : सोमवार, दिनांक १६ डिसेंबर २००२ : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, अधिकृत प्रतिवेदन, खंड १२९, क्रमांक ४, पृष्ठ १३३-१३५)*

by the Hon'ble Governor on 15 December 2001 and 12 March 2003 pursuant to Article 371 (2) of the Constitution of India." या विषयावर स्पष्टपणे लेखी मत दिले आहे. त्यांचे मत सभागृहासमोर ठेवण्यात आले असून त्यातील महत्वाचे मुद्दे पुढील प्रमाणे :-

**III. OPINION**

**III.1.** In my opinion

**(1) there is no doubt that the directives given by the Hon'ble Governor are mandatory.** *(Para III.1 of the opinion)*

(2) Article 371 begins with a *non obstante* clause. The words, "notwithstanding anything contained in the Constitution" are significant. **It marks a departure from the scheme of the Constitution** which makes all financial matters the province of the Legislature. *(Para III.1.A of the opinion)*

(3) The main order dated 9 March 1994, under Article 371(2) was issued by the President of India. The governor has to act under the presidential order. The development Boards for Vidarbha, Marathawada and the rest of Maharashtra order, 1994 brings into force the Development Boards and all matters within the meaning of this order are to be **within the exclusive discretion of the Governor** who does not act on the aid or advice of the Council of Ministers. It is therefore clear that this is a constitutional obligation vested in the Governor by the President of India as a matter of constitutional provisions and policy. *(Para III.1.B of the opinion)*

(4) The aforesaid Constitutional provisions and the scheme of the various orders which have been passed mark a **deliberate departure from the ordinary rules of Legislative business** based on broad policy considerations incorporated in Article 371 (2) and this must prevail. *(Para III.1.D of the opinion)*

**III.2.** (5) I turn now to the next issue. I am of the opinion that the **allocations of funds made by the Governor must be reflected under the Annual Financial Statement to be placed before the State Legislature and this requirement is mandatory.** *(Para III.2 of the opinion)*

राज्याच्या मंत्रिमंडळाने न्याय दिला नाही म्हणून तर कलम ३७१ (२) अमलात आले. भारतीय घटनेतील ३७१(२) हे कलम आजही जिवंत आहे. व त्या कलमातील अधिकारांचा वापर करून केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने निर्गमित केलेला भारताच्या मा. राष्ट्रपतींनी ९ मार्च १९९४ रोजी काढलेला आदेश आजही जिवंत आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेला ३० एप्रिल १९९४ चा आदेश आजही जिवंत आहे. राज्यपालांनी १५ डिसेंबर २००१ व १२ मार्च २००३ रोजी काढलेले निदेश हे आजही जिवंत आहे "राज्यपालांनी केलेल्या निधीच्या वाटपाला अंदाजपत्रकात समाविष्ट केलेच पाहिजे" ही या कायद्यातील जिवंत तरतूद आहे. या कायद्यातील तरतुदीची सन २००२-२००३ आणि २००३-२००४ या वर्षात अम्मलबजावणी कां झाली नाही?.....

***..... याचा राज्यपालांना जाब विचारण्याचे काम त्यावेळच्या गृहमंत्र्यांचे होते. ते त्यांनी कां पार पाडले नाही? हे विचारा त्यांना आणि हेही विचारा त्यांना की, त्यावेळचे गृहमंत्री कोण होते व ते कोणत्या पक्षाचे होते म्हणून.***

## (४)

सभागृहात प्रादेशिक असमतोलाबाबत विविध चर्चा उपस्थित करण्यात पुढाकार घेणारे सदस्य, सन १९९२ मध्ये जलसिंचन अनुशेषाबाबत नुटा बुलेटीनचा विशेषांक प्रकाशित करुन असमतोलाबाबतच्या लोकांच्या जाणिवा समृद्ध करण्याचा प्रयत्न करणारे सदस्य, ३७१ (२) या कलमान्वये मा. राष्ट्रपतींनी ९ मार्च १९९४ रोजी राज्यपालांना विशेष अधिकार प्रदान केल्यानंतर ३० ऑक्टोबर १९९४ रोजी मा. राज्यपालांना विधानपरिषद सदस्य या नात्याने औपचारिक पत्र लिहून त्याच वर्षात (१९९४ मध्ये) विनंती करणारे विधानमंडळाचे एकमेव सदस्य (हे पत्र सन १९९६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १०४ व १०५ वर त्यावेळी प्रसिद्ध करण्यात आले होते.), कृष्णा खोऱ्यामुळे होत असलेल्या विषम वाटपाबाबत व वाढणाऱ्या प्रादेशिक असमतोलाबाबत १९९६ मध्ये 'अनुशेष विशेषांक' काढून लोकांमध्ये जागृती करणारे सदस्य, "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष क्ष किरण परीक्षा" नावाचे पुस्तक १९९८ मध्ये प्रकाशित करुन वाढत्या असमतोलाबाबत जनजागृती करणारे सदस्य, "अनुशेष निर्मूलन व विकास मंच" या सर्वपक्षीय आमदारांच्या फोरमचे अध्यक्ष असणारे विधानपरिषद सदस्य, १५ डिसेंबर २००१ चे घटनात्मक निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करण्यात यशस्वी झालेल्या सर्व पक्षीय आमदारांच्या फोरमचे नेते या नात्याने काम करणारे प्रा.बी.टी.देशमुख ही काही फार मोठी तोफ आहे अशातला भाग नाही पण भारताच्या या भल्या थोरल्या नकाशावर विराजमान झालेल्या समृद्ध अशा महाराष्ट्र राज्यामध्ये पसरलेला "अनुशेषाचा अंधार दूर करण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेली पणती" हा बहुमान बी.टी.देशमुख यांना कोणीच नाकारू शकणार नाही. ती पणती सुद्धा विझवून टाकण्याचा अट्टाहास तुम्ही कशासाठी चालविला आहे? हे विचारा त्यांना आणि त्यांना हेही विचारा की, काही जाती जमातींना वर्षानुवर्षे मागास ठेवणे हे जसे निकोप राष्ट्राच्या प्रगतीला बाधक असते तसेच राज्यातील काही भागांना वर्षानुवर्षे अनुशेषात ठेवणे हे सुद्धा निरोगी राज्याच्या प्रकृतीला बाधक असते.....

***..... अशा असमतोलाचे राज्याच्या भवितव्यावर होणारे दूरगामी परिणाम अजूनही तुमच्या कसे लक्षात आले नाहीत म्हणून?***

## (५)

"कोणत्याही राजकीय पक्षाने उभा केलेला उमेदवार या नात्याने नव्हे तर अन्यथा (म्हणजे अपक्ष) असा सदस्य म्हणून निवडून आलेला उमेदवार अशा निवडणूकी नंतर कोणत्याही राजकीय पक्षात सामील झाला तर तो त्या सभागृहाचा सदस्य होण्यास निरर्ह (अपात्र) होईल" अशी तरतूद भारतीय संविधानाच्या दहाव्या अनुसूचिच्या परिच्छेद २ (२) मध्ये करण्यात आलेली आहे. म्हणूनच कोणत्याही उमेदवाराला आपण अपक्ष आहोत की एखाद्या पक्षाचे आहोत याची माहिती ठायी ठायी द्यावी लागते. सन १९९६ मध्ये अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातून निवडून आलेल्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरतांना आपण अपक्ष असल्याचे लिहून दिले. अपक्ष म्हणूनच त्यांच्या संघटनेने त्यांना उमेदवारी दिली होती. निवडून आल्यानंतर निवडून आल्याचे जे प्रमाणपत्र त्यांना देण्यात आले त्यामध्ये ते अपक्ष असल्याचे नमूद आहे. सभागृहात शपथ घेण्यापूर्वी नियम ४(२) अन्वये नमुना तीन मध्ये, प्रतिज्ञापत्रावर जे तपशिलाचे विवरण त्यांनी दिले त्यात त्यांनी अपक्ष म्हणूनच नमूद केले. सदस्याने भरून दिलेली माहिती विधानपरिषद सभागृहाच्या बुलेटीनमध्ये (पत्रक भाग २) प्रकाशित केली जाते. मंगळवार दिनांक २० ऑगस्ट १९९६ रोजीच्या सभागृहाच्या ११८ क्रमांकाच्या बुलेटीनच्या परिच्छेद १३४ मध्ये जी माहिती प्रकाशित करण्यात आली आहे त्यानुसार त्यांनी "अपक्ष" असल्याचीच माहिती भरून दिलेली आहे. ***असे असतांना आपल्या कार्यकालाच्या शेवटच्या वर्षात ते सभागृहात 'अपक्ष' म्हणून व सभागृहाबाहेर 'पक्ष' म्हणून दुहेरी संसार करीत होते हे खरे आहे काय? हे विचारा त्यांना आणि हेही विचारा त्यांना की 'अपक्ष' म्हणून पदत्याग करुन 'पक्ष' स्विकारण्याचा सन्माननिय मार्ग उपलब्ध असतांना ज्यांनी आपल्याला अपक्ष म्हणून निवडून दिले त्या शेकडो लोकांच्या, मतदारांच्या, हितचिंतकाच्या भावना दुखविण्याचा मार्ग त्यांनी आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाच्या शेवटच्या वर्षात कां स्वीकारला म्हणून?***

***कृष्णा खोरे प्रकल्प तुम्ही सुरु केला आम्ही फक्त आता त्याच उर्वरित उत्तरदायित्व पार पाडीत आहोत.***

*- मा. अर्थमंत्री श्री. जयंतराव पाटील*

मा. अर्थमंत्री श्री. जयंतराव पाटील यांनी विधानपरिषद सभागृहातील एका चर्चेला उत्तर देतांना मा. विरोधी पक्षनेते नितिन गडकरी यांच्याकडे बोट रोखून "मा. विरोधी पक्षनेते त्यावेळी कॅबिनेटमंत्री होते. अनेक अवाढव्य प्रकल्प तुम्ही त्यावेळी हाती घेतले. प्रादेशिक असमतोल वाढविणारा कृष्णा खोरे प्रकल्प तुम्ही सुरू केला आम्ही फक्त आता त्याचे उर्वरित उत्तरदायित्व पार पाडीत आहोत. तेव्हा तुम्ही आम्हाला याबाबत बोलू शकत नाही. याबाबत बोलण्याचा बी.टी.देशमुखांचा अधिकार मी मान्य करतो कारण यामुळे प्रादेशिक असमतोल वाढणार आहे असे विचार अतिशय सुसंगतपणे त्यावेळीसुद्धा ठामपणे मांडणारी ती व्यक्ती होती." अशा अर्थाचे उद्‌गार काढले तेंव्हा सभागृहात सन्नाटा पसरला.

# प्रा.बी.टी. देशमुखांनी आमदारकीच्या २४ वर्षीय कार्यकालात संपादित केलेल्या स्थावर मालमत्तांची मूळ खरेदी किंमत ३,८०,२४२ रुपये

*निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे प्रा.बी.टी.देशमुख यांनी सत्य प्रतिज्ञेवर दाखल केलेली मालमत्ता संपादनाबाबतची विस्तृत माहिती १ नोव्हेंबर २००४ च्या नुटा बुलेटीनमधून प्रकाशित करण्यात आली आहे. नुटा बुलेटीनमधून प्रा.बी.टी.देशमुख यांच्या आर्थिक जीवनाबद्दल जी माहिती प्रसृत करण्यात आलेली आहे त्याबाबत अमरावती येथून प्रकाशित होणाऱ्या 'हिंदुस्थान' या दैनिकाने आपल्या दिनांक १४ नोव्हेंबर २००४ रोजीच्या अंकात खालीलप्रमाणे वृत्त प्रकाशित केले आहे. ...*

"सन १९८० पासून तर २००४ पर्यंत २४ वर्षे आमदार राहिलेल्या प्रा.बी.टी.देशमुख यांनी या २४ वर्षांच्या काळात संपादन केलेल्या स्थावर मालमत्तांची संख्या केवळ २ असून त्यांची मूळ खरेदी किंमत म्हणजेच या मालमत्तांच्या संपादनासाठी त्यांनी केलेला खर्च रुपये ३,८०,२४२ (तीन लक्ष ऐंशी हजार दोनशे बेचाळीस रुपये फक्त) आहे. सत्यप्रतिज्ञेवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये ही गोष्ट त्यांनी नमूद केली असून या प्रतिज्ञापत्राची प्रत २० पृष्ठांच्या नुटा बुलेटीनमध्ये छापून प्रकाशित केली आहे."

या दोन मालमत्ता खरेदी करण्यासाठीचा हा निधी (रुपये ३,८०,२४२) उभा करतांना सुद्धा (१) आमदार होण्यापूर्वी घेतलेली एक मालमत्ता (प्लॉट) विकून त्यांना ६२४०० रुपये उभे करावे लागले. (२) आमदार होण्यापूर्वी काढलेल्या आयुर्विमा महामंडळाच्या तीन पॉलिसीज अकाली मोडून २० हजार रुपये उभे करावे लागले. (३) घरावर व शेतावर दिड लक्ष रुपयांचे कर्ज काढावे लागले. या दिड लक्ष रुपयांच्या कर्जाची परतफेडसुद्धा त्यांना त्यांच्या "पेन्शनरी बेनिफिटस्" मधून करावी लागली. याबाबतचे बारीकसारीक सारे तपशील या नुटा बुलेटीनच्या माध्यमातून प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रकाशित केलेले आहेत. - **संपादक**

# बी.टी. : मालमत्ता प्रतिज्ञापत्राच्या प्रती वाटणारा पहिला वारकरी

*( "बी.टी. : मालमत्ता प्रतिज्ञापत्राच्या प्रती वाटणारा पहिला वारकरी" अशा मथळ्याखाली अमरावती येथून प्रकाशित होणाऱ्या दै. 'जनमाध्यम' या वृत्तपत्राने दि. ११ नोव्हेंबर २००४ रोजीच्या अंकात पुढील प्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे.)*

" अमरावती, १० नोव्हेंबर : बी.टी.देशमुख! विधानपरिषदेच्या अमरावती पदवीधर मतदार संघाचे पाच-दहा वर्षे नव्हे, तर सलग २४ वर्षांपासून प्रतिनिधीत्व करणारे आमदार. आमदारकी मिळाल्यानंतर अवघ्या दोन ते तीन वर्षातच आमदाराचे राहणीमान, वागण्याची पद्धत, आर्थिक परिस्थिती सर्व काही बदलून जाते. परंतु, **चोवीस वर्षे आमदारकीचा बहुमान मिळविणारे बी.टी. देशमुख यांनी** विधानपरिषद निवडणूकीसाठी नामांकन अर्ज दाखल करतांना आपल्या मालमत्तांची **सादर केलेली यादी बी.टी. देशमुखांप्रमाणेच एक आदर्श निर्माण करणारी ठरली आहे.** ही यादी केवळ निवडणूक अधिकाऱ्यांपुरतीच मर्यादित ठेवण्यात आली नसून ती मतदारांपर्यंत पोहोचविण्यात आली आहे. 'नुटा बुलेटीन'मध्ये त्यांनी याची तपशीलवार माहिती दिली आहे. अशा प्रकारे आपल्या २४ वर्षांच्या कारकिर्दीची व मालमत्तांची विस्तृत माहिती मतदारापर्यंत पोहोचविणारे ते विदर्भातील पहिले नेते ठरले आहेत."

## मालमत्ता खरेदीसाठी निधी कोठून आला? याच्या तपशीलासह मालमत्तांची यादी समाविष्ट असलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत थेट जनतेच्या हाती देणारे ते विदर्भातील पहिले नेते ठरले आहेत.

*( नागपुर येथून प्रकाशित होणाऱ्या दै. लोकसत्ता या वृत्तपत्राने प्रा.बी.टी.देशमुख यांनी सादर केलेल्या आर्थिक जीवनाबद्दल जे वृत्त १० नोव्हेंबर २००४ च्या अंकात प्रसिद्ध केले त्यातील काही मजकूर पुढील प्रमाणे आहे.)*

"अमरावती, ९ नोव्हेंबर : (वार्ताहर) विधानपरिषदेत सलग २४ वर्षे प्रतिनिधीत्व करणारे प्रा.बी.टी.देशमुख हे आमदारकीच्या काळात फक्त ३ लाख ८० हजाराची मालमत्ता खरेदी करु शकले... अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपावेतो त्यांनी कोणताही भत्ता विद्यापीठाकडून घेतलेला नाही, शिवाय 'नुटा' या संघटनेकडूनही भत्ता घेण्याचे त्यांनी टाळले... आज प्रकाशित झालेल्या नुटा बुलेटीनमधून ही माहिती उपलब्ध झाली आहे. **मालमत्ता खरेदीसाठी निधी कोठून आला? याच्या तपशीलासह मालमत्तांची यादी समाविष्ट असलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत थेट जनतेच्या हाती देणारे ते विदर्भातील पहिले नेते ठरले आहेत.** "उमेदवारी अर्ज भरतांना उमेदवाराने दिलेली स्थावर व जंगम मालमत्तांची केवळ यादी महत्वाची नाही, तर या मालमत्ता संपादनाच्या कामी आलेल्या निधीचे स्त्रोत काय आहेत, हे जाणून घेण्याचा लोकांना अधिकार प्राप्त झाला आहे." नुटा बुलेटीनमध्ये बी.टीं.नी हे वाक्य लिहितांना आपल्या संपूर्ण जीवनकाळातील अर्थप्राप्तीचे, खर्चाचे तपशीलवार विवरण सादर केले आहे. राजकारणातील भ्रष्टाचाराविषयी सातत्याने ओरड होत असण्याच्या काळात बी.टीं.नी २० पानांमध्ये जनतेसाठी उपलब्ध करुन दिलेला मजकूर राजकारण्यांच्या डोळ्यात अंजन घालणारा ठरला आहे. तसेच"प्रतिज्ञापत्राची प्रत आपणहून वाटणारा पहिला वारकरी होण्याचा मान मिळाला नाही तरी अशा उपासकांच्या आघाडीवर असलेल्या ५-१० वारकऱ्यात आपले स्थान असावे" ही भावना त्यांनी व्यक्त केली आहे. त्यांचे हे प्रतिज्ञापत्र त्यांनी आजवर जपलेल्या मुल्यांचे उत्तम उदाहरणच ठरले आहे."

## प्रा.बी.टी.देशमुख यांचा विधानपरिषदेतील विविध विषयांवरील चर्चेतील सहभाग तसेच त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची सूची

*तळमळीने काम करणाऱ्या सदस्याला सभागृहामध्ये काम करणे, विविध आयुधांचा वापर करणे व त्यातून प्रश्न सोडवून घेणे किंवा मार्गी लावणे हे मनस्वी आनंद देणारे असले तरी त्या कामकाजाचा थोडक्यात आढावा सादर करणे हे मोठे जिकिरीचे काम आहे. **"प्रा.बी.टी.देशमुख यांचा विधानपरिषदेतील विविध विषयांवरील चर्चेतील सहभाग तसेच त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची सूची"** जर आपण काळजीपूर्वक पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की, १९८० ते १९८६ या पहिल्या कार्यकालात ही संख्या ५४९ आहे. १९८७ ते १९९२ या दुसऱ्या कालखंडात ही संख्या ७६८ असून १९९३ ते १९९८ या कालखंडात ही संख्या १६४० झाली. १९९९ ते २००४ या **चौथ्या कालखंडात कामाचा हा वेग खूपच वाढल्याचे दिसून येते.** या सहा वर्षांच्या चौथ्या कालखंडात (सन २००४ च्या दुसऱ्या अधिवेशनापर्यंत) ही संख्या २३२९ वर गेलेली दिसून येते. सभागृहातील कामाचा 'धडाका' काय असतो याचा नमुना मतदारासमोर ठेवणे एवढाच हेतू यामागे आहे. - **संपादक.***

**विश्लेषण**

| वर्षे | क्रमांक | एकूण |
|---|---|---|
| १९८० ते १९८६ | १ ते ५४९ | ५४९ |
| १९८७ ते १९९२ | ५५० ते १३१७ | ७६८ |
| १९९३ ते १९९८ | १३१८ ते २९५७ | १६४० |
| १९९८ ते २००४ | २९५८ ते ५२८६ | २३२९ |
| एकूण | | ५२८६ |

*(१) "सन १९८० चे तिसरे अधिवेशन ते सन १९९४ चे तिसरे अधिवेशन" या कालखंडातील "कालानुक्रमे प्रश्न सूची : १" अनुक्रमांक १ ते १७५४ ही १९९७ च्या नुटा बुलेटीनच्या (आमदार प्रा.बी.टी.देशमुख अभिनंदन विशेषांकात) पृष्ठ ८५ ते १३२ वर प्रसिद्ध केलेली आहे. (२) "सन १९९५ चे पहिले अधिवेशन ते सन २००४ चे दुसरे अधिवेशन" या कालखंडातील "कालानुक्रमे प्रश्न सूची : २" अनुक्रमांक १७५५ ते ५२८६ ही २००१ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ११२१ ते १९९९ वर प्रसिद्ध केलेली आहे. (३) सूची २ मध्ये पृष्ठ ११३२ वर 'सहभाग व समभाग'मध्ये क्रमांक ११ नंतर "(१२) प्र.य.दातार ... १९८० ते १९८६" असे वाचावे. - **संपादक.***

# प्रा.बी.टी.देशमुख : अल्प परिचय

एका अत्यंत गरीब पण 'शुचीनाम' कुटुंबात बेलोरा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती येथे २१ ऑगस्ट १९३९ रोजी जन्म. अतिशय परिश्रमपूर्वक काम करून स्वतःच्या शिक्षणासाठी स्वतः पैसे कमावून माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन व पदव्युत्तर शिक्षण संपादन केले. शालेय व महाविद्यालयीन काळात वादविवाद स्पर्धेतून प्रभावी वादविवादपटू व वक्ता म्हणून "महादेव गोविंद रानडे वक्तृत्व स्पर्धे" सारख्या प्रतिष्ठाप्राप्त स्पर्धेतून प्रथम पारितोषिक व त्याशिवाय डझनावारी बक्षिसे व पारितोषिकांचे मानकरी. मेधावी वक्ता व विद्यार्थी म्हणून नावलौकिक.

समाजकार्य करण्याची जिद्द असल्याने व अंगभूत नेतृत्वगुणांमुळे आर्थिक दुर्बलतेवर मात करून १९६०-६१ या शैक्षणिक वर्षात अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाच्या छात्रसंघाचे अध्यक्ष म्हणून निर्वाचित. महाविद्यालयासाठी तत्कालीन शासनाकडून राज्यशास्त्र, इतिहास, संस्कृत व इंग्रजी या विषयाचे पदव्युत्तर वर्ग आणि मुलींचे आणखी एक नवे भव्य वसतिगृह मिळविण्यात सिंहाचा वाटा. नागपूर विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या कार्यकारिणीचे १९६०-६१ मध्ये सदस्य. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे व विद्याव्यासंगाचे फळ म्हणजे १९६४ साली राज्यशास्त्र विषयाच्या एम.ए. परीक्षेत नागपूर विद्यापीठातून त्यांनी प्राप्त केलेले प्रथम क्रमांकाचे स्थान.

१९६४ पासून कर्मयोगी शिक्षणमहर्षी डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेल्या अमरावतीच्या श्री. शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून राज्यशास्त्राच्या अध्यापनास प्रारंभ. एक अत्यंत कुशल प्राध्यापक म्हणून लौकिक. "भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन" या अभ्यासपूर्ण ग्रंथाचे १९६५ मध्ये लेखन. त्यांनी राज्यशास्त्र विषयावर लिहिलेली अनेक पुस्तके विद्यार्थ्यांच्या अतिशय आवडीची ठरली आहेत.

नागपूर विद्यापीठ सिनेट सदस्य, १९६९ ते १९८६, नागपूर विद्यापीठ कार्यकारिणीचे सदस्य, १९७६ ते १९८५, नागपूर विद्यापीठ ॲकॅडेमिक कौंन्सिल सदस्य १९७९ ते १९८२, नागपूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे डीन (अधिष्ठाते) १९७९ ते १९८२., नागपूर विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य १९६७ ते १९७५. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून १९८३ ते १९९२ पर्यंत कार्यकारी परिषदेचे व १९९५ पासून १९९९ पर्यंत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणून कार्य.

अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून सिनेट सदस्य, सोशल सायन्स फॅकल्टीचे डीन (१९९२ ते १९९६) म्हणून कार्य. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकच्या पहिल्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य (१९८९ ते १९९२). पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य (१९८४ ते १९८६) व त्यानंतर पुन्हा १९९४ ते आजतागायत सदस्य.

संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना "नियमित वेतनाची व्यवस्था" लागु करण्यासाठी १९७७ मध्ये शासनाने नेमलेल्या समितीचे सदस्य. अतिरिक्त शिक्षकांचे निर्धारण व समायोजन करण्यासाठी नागपूर विद्यापीठाने नेमलेल्या "ॲडव्हाक कमेटीचे" (१९७६) सदस्य म्हणून महत्वपूर्ण कार्य. अतिरिक्त शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी योजना तयार करणाऱ्या राज्यस्तरीय पाच सदस्यीय समितीचे सदस्य म्हणून अतिरिक्त शिक्षकांच्या दृष्टीने फार महत्वपूर्ण भूमिका.

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ (NUTA) या प्राध्यापक संघटनेचे १९७३-७४ पासून आजतागायत अध्यक्ष. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) एक संस्थापक सदस्य, प्रारंभापासून आजतागायत महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, १९९० ते १९९२ व पुन्हा १९९२ ते १९९४ पर्यंत महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्य. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या (AIFUCTO) राष्ट्रीय कार्यकारी मंडळाचे १९९४ पासून आजपावेतो सदस्य.

डिसेंबर १९८० मध्ये विदर्भ पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणून पहिल्यांदा निवड. डिसेंबर १९८६ मध्ये अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर फेरनिवड. डिसेंबर १९९२ मध्ये अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर तिसऱ्यांदा तर १९९८ मध्ये चौथ्यांदा फेरनिवड. ही त्यांच्या कार्य व कर्तृत्वाची मतदारसंघाने दिलेली पावती ठरते.

डिसेंबर १९९६ मध्ये राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानपरिषदेतील पहिल्या "उत्कृष्ट संसदपटू" पुरस्काराचे मानकरी. राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य या नात्याने ग्रेट ब्रिटन, बेल्जियम, फ्रान्स, नेदरलंड, स्वित्झलंड, जर्मनी या देशांच्या अभ्यास दौऱ्यात सहभाग. (२६ सप्टेंबर १९९७ ते १३ ऑक्टोबर १९९७) महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या (१९९४) विधेयकासाठी महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी नेमलेल्या संयुक्त चिकित्सा समितीचे सदस्य म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या निर्मितीत महत्त्वाचे योगदान. नाशिक येथील १६२ वर्षाची परंपरा लाभलेल्या सार्वजनिक वाचनालयातर्फे सुरू करण्यात आलेल्या कै.माधवराव लिमये स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या "**कार्यक्षम आमदार**" पुरस्काराचे पहिले मानकरी. (८ फेब्रुवारी २००३)

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आश्वासन समितीचे १९८२ पासून आजतागायत सातत्याने सदस्यत्व. १९८९ मध्ये या समितीचे समिती प्रमुख म्हणून कार्य संचालन. या व्यतिरिक्त विधानमंडळाच्या ग्रंथालय समिती, नियम समिती, विशेषाधिकार समिती, उपविधान समिती इत्यादी समित्यांतून बजावलेली महत्वपूर्ण भूमिका. महाराष्ट्र विधानपरिषदेचे अस्थायी सभापती (Chairman Pro tem) म्हणून जुलै १९९८ मध्ये मा. राज्यपालांकडून नियुक्ती. १९ जुलै १९९८ ते २४ जुलै १९९८ या काळात विधानपरिषदेचे अस्थायी सभापती या नात्याने कार्य. विदर्भाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व अनुशेष विषयक प्रश्नांची विशेष जाण असलेला सांसद म्हणून लौकिक. "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष : क्ष किरण परीक्षा" या पुस्तकाचे लेखक . अनुशेष विषयक प्रश्नांची विवेचक व अभ्यासपूर्ण चर्चा विधानपरिषदेत घडवून समस्यांचे निराकरण करण्याची त्यांची हातोटी व कार्य बहुमोल, सर्वश्रुत, सर्वविदीत व प्रशंसनीय सिद्ध झाल्याचा सर्वच प्रसारमाध्यमांचा एकमुखी निर्वाळा. अनुशेष निर्मूलनार्थ स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधान मंडळाच्या उभय सभागृहाच्या "अनुशेष निर्मूलन व विकास मंच" या सर्वपक्षीय आमदारांच्या फोरमचे २००१ पासून अध्यक्ष.

"अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ! स्वाध्यायाभ्यासनं चैव" (हितार्थ बोलणे सत्य, प्रेमाने न खुपेलसे, स्वाध्याय करणे नित्य) या बाण्याने आपल्या वाणीच्या सामर्थ्याने इप्सित लक्ष्य टिपणारा एक सुदूरदृष्टीचा आमदार म्हणून सर्वदूर मान्यता. एक अत्यंत अभ्यासू सांसद, प्रभावी वक्ता, आणि उत्कृष्ट संघटक म्हणून महाराष्ट्रभर लौकिक.

******

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

**आपला मतदार क्रमांक व यादीचा भाग क्रमांक या अंकावरील आपल्या पत्त्यावर नमूद आहे.**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Licenced to post without prepayment **LICENCE NO. NR/ATI/78/2002** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **18.11.2004**

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................